**MHKO100000672022**

<u>आदेश निशाणी क्र. २३</u>

१. प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता यांचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्ती होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्ज वाचला. प्रतिवादी यांनी सदर अर्जास आपले म्हणणे दाखल केले नाही त्यामळे प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणणे विना चालला आहे. वादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला, त्यांनी त्यांचे अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केला आहे.

३. वादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी मौजे नरेवाडी येथील गट नं. २४२ या मिळकतीमध्ये दक्षिण पश्चिम कोप-यामध्ये अतिक्रमण करुन बेकायदा बांधकाम करणेचा प्रयत्न केला म्हणून प्रतिवादी यांचे विरुध्द कायम मनाई होणेकरीता दाखल केलेला आहे. त्यामध्ये निशाणी क्र. ५ चे अर्जावर प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये पुढील बांधकाम करु नये व बांधकामाची आहे ती स्थिती ठेवावी असा अंतरिम आदेश दिनांक २०/१/२०२२ रोजी केलेला आहे. सदरहू अंतरीम आदेशची माहिती वादी यांनी प्रतिवादी यांना रजि. पोष्ट ए.डीने पाठविलेली आहे. असे असताना प्रतिवादी यांनी दांडगाव्याने मे कोर्टाचा आदेश अस्तीत्वात असताना दावा मिळकतीमध्ये बांधकाम सुरुच केले व मे.कोर्टाच्या आदेशाचा अवमान करुन दावा मिळकतीमध्ये बांधकाम पूर्ण केले आहे. त्यामुळे

प्रतिवादी यांचे विरुध्द अनुषंगिक पुढील आदेश मागणेकरीता दुरुस्ती करणे भाग पडले आहे.

**४.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये मागीतलेली दुरुस्ती ही आदेशात्मक मनाईकरीता व प्रतिवादी यांनी दावा दाखल झाल्यानंतर केलेल्या बांधकामाबाबत आहे. यावरुन असे दिसून येते की, वादी यांनी मागीतलेली दुरुस्ती ही मुळ दाव्याशी सलग्न अशी आहे. अशा परिस्थितीत वाद अंतिमरित्या संपविण्याकरीता सदरचे कथन मुळ दाव्यात समाविष्ठ करण्याकरीता वादीस संधी देणे संयुक्तीक वाटते. सबब अर्जात सुचविलेल्या दुरुस्ती समाविष्ठ करण्यास परवानगी दिल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामधील असलेला मुळ वाद एकाच प्रकरणामध्ये निर्णित होणेस मदत होणार आहे. प्रतिवादी यांनी सदर अर्जास आपले म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविलेला नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. म्हणून मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## <u>आ दे श</u>

**१)** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२)** वादी यांनी १४ दिवसात दाव्यात दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत सत्वर दाखल करावी.

**३)** या अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येत आहे.

DHANASHRI MAHADEV PAWAR
Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2023.09.12 17:48:08 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १२/०९/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज